कोरोना Lockdown शिथिल झाल्यानंतर राज्यातील शाळा / शिक्षण टप्प्या-टप्प्याने सुरू करणेसंदर्भात मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२०/ प्र.क्र. ८६ / एसडी-६

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दि. १५ जून, २०२०

**वाचा :** १. केंद्र शासनाचे गृह मंत्रालयाचे आदेश,
क्र. MHA No 40-3/2020 DM-I (A), दि. ३०.०५.२०२०

२. महसूल व वन विभागाचे आपत्ती व्यवस्थापन आदेश
क्र. DMU-2020/CR-92-I/DISM-1 दि. ३१.०५.२०२०

३. मा मुख्यमंत्री यांची दि.३१ मे २०२० ची व्हिडीओ कॉन्फरन्स

४. शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
क्र. संकीर्ण २०११/(१४३/११)/ प्राशि-५, दि. ३०.०५.२०११

**प्रस्तावना :-**

सर्वसाधारणपणे दरवर्षी जून महिन्यात शैक्षणिक वर्ष सुरु होत असते. मात्र यावर्षी राज्यातील शाळा केंव्हा व कोणत्या निर्बंधासह/ नियमांसह सुरु केल्या जाव्यात याबाबत निर्णय घेणे अत्यंत आवश्यक असल्याने शाळा जरी सुरु झाल्या नाहीत तरी शिक्षण व शैक्षणिक वर्ष मात्र वेळेवर सुरु करणे तसेच विद्यार्थ्यांना शाळेत सुरक्षित कसे ठेवावे व शैक्षणिक वर्ष व शिक्षण हे Online किंवा Offline पध्दतीने १५ जून पासुन सुरु झाले पाहिजे याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

राज्यातील काही भागात विशेषत: ग्रामीण व आदिवासी विकास क्षेत्रात तसेच Containment Zone व्यतिरिक्त क्षेत्रात शिथीलता आणली जाऊ शकते किंवा तेथे असलेले निर्बंध शिथिल केले जाऊ शकतात. त्यामुळे शैक्षणिक वर्ष हे सुरु करता येईल.

राज्यात शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था /खाजगी व्यवस्थापनांच्या अनुदानित, विनाअनुदानित तसेच स्वयंअर्थसहाय्यित शाळांचे ग्रामीण भागातील प्रमाण खूप मोठे आहे. राज्यातील विविध जिल्हे व महानगरपालिका क्षेत्र वेगवेगळया श्रेणींमध्ये सूचित केलेले असतील व त्यानुसार लॉकडाऊन विषयक निर्बंधही वेगवेगळे असतील. तसेच राज्यातील शाळांची पटसंख्या, उपलब्ध पायाभूत सुविधा व वर्गखोल्या, विद्यार्थ्यांसाठी चालणारे सत्र, विद्यार्थ्यांसाठीची बसण्याची व्यवस्था, स्वच्छतेच्या सुविधा, त्यांना उपलब्ध प्रवासाची सुविधा इ. बाबींमध्येही विविधता आहे. त्यामुळे, प्रत्यक्ष (Physically) शाळा केंव्हा सुरू कराव्यात याबाबत शाळानिहाय स्थिती विचारात घेऊन जिल्हा स्तरावर व ग्रामीण / शहरी स्तरावर टप्प्या-टप्प्याने शाळा सुरू करण्याचे निर्णय घेणे संयुक्तिक ठरेल. या बाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे शिक्षण क्षेत्रातील नामवंत व तज्ञ व्यक्तींशी चर्चा करून ऑनलाईन तसेच ऑफलाईन पद्धतीने शिक्षण सुरू करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. याशिवाय शाळा केंव्हा व कशा सुरु कराव्यात याबाबत शिक्षण क्षेत्रातील काही नामवंत शिक्षण संस्थाचे प्रमुख, लोकप्रतिनिधी, क्षेत्रीय अधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व पालक, इत्यादींशी सर्वसमावेशक चर्चा करण्यात आली. तसेच केंद्र शासनाच्या स्वास्थ्य आणि परिवार कल्याण मंत्रालयाकडून शाळा सुरु करण्याविषयी देण्यात येणाऱ्या सविस्तर सुचना (SOP), चर्चांमधील उपस्थित करण्यात आलेल्या सुचना यांचा एकत्रित विचार करून शाळा/शिक्षण टप्प्या- टप्प्याने सुरु करण्याविषयी सविस्तर सुचना परिपत्रक निर्गमित करण्याची बाब विचाराधिन होती.

## परिपत्रक

राज्यात कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूच्या प्रादुर्भावामुळे विपरीत परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीमध्ये शिक्षण व शैक्षणिक वर्ष वेळेवर सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सन २०२०-२१ हे शैक्षणिक वर्ष सुरु करण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

१) राज्यातील सर्व शाळांनी शाळा व्यवस्थापन समितीची बैठक विदर्भामध्ये २६ जून रोजी तर उर्वरीत ठिकाणी १५ जून रोजी आयोजित करावी. सदर बैठकांमध्ये शाळा सुरु करण्यापूर्वी करावयाची तयारी, शाळेची व स्वच्छतागृहाची स्वच्छता, शाळा सुरु केल्यानंतर घ्यावयाची दक्षता, विद्यार्थ्यांची गर्दी होवू नये म्हणून करावयाचे

नियोजन, इत्यादी. बाबत निर्णय घ्यावा. सदर बैठक स्थानिक परिस्थितीप्रमाणे प्रत्यक्ष सुरक्षित शारीरिक अंतर ठेवून शाळेत किंवा व्ही. सी./ WhatsApp द्वारे आयोजित करावी.

२) शाळेत क्वारंटाईन केंद्र किंवा निवारा केंद्र असल्यास ग्रामपंचायत/ नगरपालिका / महानगरपालिका / जिल्हा प्रशासनामार्फत त्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करून घेण्यात यावे. तसेच सदर शाळा ही शिक्षक व विद्यार्थ्यांच्या वापरासाठी सुरक्षित असल्याबाबतचे प्रमाणपत्र द्यावे.

३) शाळा व्यवस्थापन समितीच्या मुख्य शिफारशी तसेच तज्ञ व्यक्ती यांच्या शिफारशीनुसार कन्टेनमेंट झोनमधील जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांनी शाळा केंव्हा सुरु कराव्यात याबाबतचा निर्णय घ्यावा.

**(अ) घरात राहुन किवा Online/Digital किंवा ऑफलाईन शिक्षण (Learning from Home) याचे नियोजन खालीलप्रमाणे करावे :**

भविष्यात वेगळया अध्ययन - अध्यापन पध्दतीचा (Learning - Teaching Pedagogy) अवलंब करताना यापुढे वेगवेगळया पध्दतीने शिक्षण देणे आवश्यक राहील. नेहमीचे Lecture पध्दती टाळून, मुलांनी स्वयं अध्ययन करावे व त्यांनतर त्यांच्या शंका व प्रश्नाचे निराकरण शिक्षकांनी करावे.

डिजीटल माध्यमांचा वापर करून शासनाच्या ई-लर्निंग शैक्षणिक सुविधे बाबतची माहिती दि. २८ एप्रिल २०२० च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आली आहे. त्या परिपत्रकातील सूचनांचे पालकांनी जास्तीत जास्त पालन करण्याबाबत त्यांना प्रोत्साहित करावे.

भविष्यामध्ये टीव्ही, रेडीओ इत्यादी माध्यमांद्वारे ऑनलाईन शिक्षण उपलब्ध होणार आहे. त्याचा मुलांनी वापर करावा.

**(आ) कन्टेनमेंट झोनमधील शाळा सुरु करणे**

या क्षेत्रात शाळा प्रत्यक्ष (Physically) सुरु करण्याची कोणतीही निश्चित तारीख ठरविता येत नाही. स्थानिक व बदलत्या परीस्थितीनुसार शाळा सुरु करण्यापूर्वी त्या त्या जिल्ह्याच्या Covid-१९ Disaster Management committee चे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका क्षेत्रांसाठी संबंधित महानगरपालिका

आयुक्तांनी शाळा प्रत्यक्ष (physically) केंव्हा सुरू कराव्यात याबाबतचा निर्णय घ्यावा. डिजीटल माध्यमांचा वापर करून शासनाच्या ई-लर्निंग शैक्षणिक सुविधेबाबतची माहिती दि. २८ एप्रिल २०२० च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आली आहे. त्या परिपत्रकातील सूचनांचे पालकांनी जास्तीत जास्त पालन करण्याबाबत त्यांना प्रोत्साहित करावे.

**(इ) भविष्यात शाळा प्रत्यक्षात सुरू करताना शाळा व्यवस्थापन समितीने खालील बाबींवर विचार करावा.**

१. विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित शारिरिक अंतर राखणे शक्य व्हावे याकरीता शाळा दोन सत्रांमध्ये (शिफ्टमध्ये) सुरू करणे, एक सत्र (शिफ्ट) जास्तीत जास्त ३ तासाची असावी किंवा वेगवेगळ्या वर्गाच्या विद्यार्थ्यांनी एक दिवस सोडून (अदलाबदलीने) शाळेत यावे (odd-even days). प्रत्येक सत्राचा कालावधी व वेळापत्रक ठरवावे. उदा. सकाळी ९ ते १२ वाजेपर्यत, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यत इत्यादी किंवा सोमवार, बुधवार व शुक्रवार वर्ग १ व २ व मंगळवार, गुरुवार व शनिवार वर्ग ३ व ४ असे वर्ग सुरु करावेत.

२. एका वर्गात एका बेंचवर एक विद्यार्थी, किंवा १ वर्गात जास्तीत जास्त २० ते ३० विद्यार्थी बसण्याची व्यवस्था कशी करावी, बैठक व्यवस्थेमध्ये किमान एक मिटर अंतर ठेवावे, इत्यादी.

३. शाळेच्या इमारतीत अतिरिक्त खोल्या असल्यास त्या स्वच्छ करून वापरण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. शाळा स्वच्छतेसाठी उपाययोजना करण्यात याव्यात, विद्यार्थ्यांना हात धुण्यासाठी ग्रामपंचायतीच्या मदतीने सुविधा उपलब्ध करून देणे उदा. साबण व पाणी इत्यादी. खाजगी अनुदानित /विना अनुदानित / स्वयं अर्थसहाय्यित शाळांच्या बाबतीत शाळांमधील स्वच्छ्ता, निर्जंतुकीकरण करावे.

४. बसेस / ऑटोमध्ये मुलांची गर्दी होऊ नये यासाठी काय व्यवस्था करावी, हे शाळा व्यवस्थापन समितीने ठरावावे. उदा. मुलांनी शाळेत पायी किंवा सायकलीने यावे, किंवा पालकांनी त्यांना स्कूटर / सायकलीने शाळेस सोडावे, अशा पर्यायाचा विचार करता येऊ शकतो.

५. १ जुलै पासून प्रत्यक्ष शाळा सुरू होईपर्यंत शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत ज्या प्रमाणे मार्च / एप्रिल महिन्यात विद्यार्थ्यांना धान्य वाटप करण्यात आले, त्याचप्रमाणे योग्य नियोजन करून विद्यार्थ्याना घरपोच धान्य वाटप करावे.

शाळा प्रत्यक्ष सुरु झाल्यानंतर पुढील कालावधीसाठी धान्य घरपोच द्यावे अथवा शाळेत आहार तयार करुन द्यावा याबाबत निर्णय घ्यावा.

६. सर्व विद्यार्थांना त्या त्या इयत्तांची शालेय वर्ष २०२०-२१ साठीची विषयनिहाय सर्व पाठ्यपुस्तके वाटप करण्याबाबतचे नियोजन करावे.

७. भविष्यामध्ये कोरोना (कोव्हिड -१९) चे रुग्ण आढळल्यास किंवा इतर कारणांमुळे शाळा बंद करावी लागल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडीत होणार नाही यासाठी ऑनलाईन शिक्षणाचे नियोजन करावे.

८. दिनांक १५ जून/ २६ जून पासून पुढील २ आठवडे शाळापूर्व तयारी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी. सोबत "**परिशिष्ट**" जोडले आहे.

९. जे स्थलांतरीत मजूर गावी परत गेले आहेत त्यांच्या मुलांना गावातील शाळेत प्रवेश, पाठ्यपुस्तके व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे.

१०.घरात तयार केलेले मास्क वापरणे ,सुरक्षित शारीरिक अंतर ठेवणे , ज्या ठिकाणी वारंवार हात लावले जातात उदा. दरवाजे, Handle, खिडक्या इ. त्यांना स्पर्श न करणे, स्वच्छता व त्यासंबंधी घ्यावयाची काळजी याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना / पालकांना द्यावी.

११. मुलांनी स्वत:ची बॅग, पुस्तके, पाणी बॉटल, पेन, पेन्सिल इत्यादी शैक्षणिक साहित्य शाळेत येताना बरोबर घेऊन येण्याबाबत सुचना द्याव्यात.

१२.शाळेत शिक्षक व विदयार्थी यांच्या व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश देण्यात येऊ नये.

शाळा व्यवस्थापन समितीने पालक शिक्षक संघ (PTA) यांचेशी वरील सर्व बाबींसंदर्भात चर्चा करून शाळा सुरु करणे अणि अनुषंगिक बाबींची कार्यवाही करणे बाबत नियोजन करावे.

**(ई) ग्राम पंचायतीची जबाबदारी**

१. ग्रामपंचायतीने शाळेतील फर्निचर बाजूला करून फरशीची साबणाच्या पाण्याने साफसफाई करुन घ्यावी. तसेच शाळेचे निर्जंतुकीकरण, वीज व पाणीपुरवठ्याची व इतर अनुषांगिक बाबींची जबाबदारी घ्यावी.

२. बाहेर गावातून येणाऱ्या शिक्षकांची येण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी अथवा त्यांनी करून घेतलेल्या वैद्यकीय तपासणीची खातरजमा वैदयकीय प्रमाणपत्राच्या आधारे करावी .

३. एखाद्या शाळेतील सर्वच शिक्षकांची कोरोना (कोव्हिड-१९) च्या कामकाजासाठी सेवा अधिग्रहीत केली असल्यास आणि ते शिक्षक शाळा सुरू

होण्याचे दिवशी शाळेत उपस्थित राहू न शकल्यास स्थानिक पातळीवर नियोजन करून शिक्षक उपलब्ध करून देण्याची सोय करावी / स्थानिक अर्हताप्राप्त स्वयंसेवकांची मदत घ्यावी.

४. विद्यार्थ्यांकरीता शाळांमध्ये साबण, पाणी, मास्क, सॅनिटायझर या सुविधा १५ व्या वित्त आयोगातील प्राप्त निधीतून पुरविण्याबाबत निर्णय घ्यावा. " मनरेगा" अंतर्गत निधी शाळेच्या स्वच्छतेकरिता वापरण्यात यावा.

५. ग्रामपंचायतीने मुलांचे थर्मल स्क्रिनिंग / वैद्यकीय तपासणी करुन घेण्यासाठी संबंधित प्राधिकाऱ्यांशी समन्वय साधावा.

**(उ) पालकांची जबाबदारी**

मुलांना घरातून मास्क घालून पाठविणे, पाण्याच्या बाटल्या देणे, हात रुमाल व छोटया चटई देणे, मुलांना मास्कची सवय लावणे, तोंडाला स्पर्श न करण्याची सवय लावणे, हात साबणाने धुण्याची सवय लावणे, घरातील मोबाईल फोन आवश्यक वेळेसाठी मुलांना पालकांच्या नजरेखालीच उपलब्ध करुन द्यावेत.

इयत्ता १ ली व २ री च्या मुलांनी प्रत्यक्ष (ऑफलाईन) शाळा सुरू होईपर्यंत घरातून अभ्यास करावा.

पालकांनी पाल्य आजारी असल्यास पाल्यास शाळेत पाठवू नये.

**(ऊ) शिक्षकांची जबाबदारी**

१. राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ हे विदर्भ वगळता १५ जून पासून सुरु होत असून विदर्भातील शाळांचे शैक्षणिक वर्ष हे २६ जून पासून सुरु होते. राज्यामध्ये संचारबंदी सुरु झाल्यापासून तसेच उन्हाळ्याची सुट्टी सुरु झाल्यापासून बरेच शिक्षक स्वत: चे मुख्यालय सोडून स्वत: च्या मूळ गावी गेल्याचे निदर्शनास येत आहे .

त्यामुळे अशा सर्व शिक्षकांनी स्थानिक प्रशासनाची योग्य ती परवानगी घेऊन शाळा सुरु होण्यापूर्वी शाळेच्या कार्यक्षेत्रामध्ये उपस्थित रहावे. जेणेकरून त्यांना १५ जून व २६ जून रोजी त्यांच्या कार्यरत शाळेमध्ये उपस्थित राहता येईल.

तसेच जे शिक्षक या काळात कोरोना (कोव्हिड-१९) च्या कामकाजासाठी कार्यरत आहेत, त्यांनी संबंधित प्रशासनाने कार्यमुक्त केल्यानंतर होम क्वारंटाईनची अट असल्यास त्याचे योग्य ते पालन करून आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह (कार्यमुक्ती आदेश, वैद्यकीय प्रमाणपत्र, ई पास इत्यादी.) संबंधित शाळेत कामकाजासाठी

उपस्थित राहावे. यासाठी उपलब्ध सार्वजनिक/ खाजगी वाहनव्यवस्थेचा वापर करावा.

२. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शिक्षकांनी शाळेत उपस्थित राहिल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहून ऑनलाईन प्लॅटफॉर्म / टी व्ही/ रेडीओ/ दिक्षा ॲप इत्यादीच्या मदतीने अध्ययन होण्यासाठी त्यांना मदत करावी. तसेच विद्यार्थ्यांचे शिक्षण होण्यासाठी पालकांनाही मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके प्राप्त झाली असल्याने त्यांना मोबाईल तसेच विविध संपर्क माध्यमातून स्वाध्याय द्यावा. तसेच त्यांच्या शंकांचे निरसन करून अध्ययन सुरू ठेवावे.

३. ज्या विदयार्थ्यांना अभ्यासात शंका /प्रश्न निर्माण होत असतील अशा विद्यार्थ्यांच्या शंका/ प्रश्नांचे फोनद्वारे किंवा इतर माध्यमांद्वारे निराकारण करावे.

४. दिनांक १५ जून २०२० पर्यंत सर्व पाठयपुस्तके शाळेपर्यंत पोहचविण्याची व्यवस्था संचालक (प्राथमिक) यांचेमार्फत करण्यात येत आहे. पाठ्यपुस्तकांचे वाटप पालकांना शाळेत टप्प्या-टप्प्याने बोलावून व आवश्यक सुरक्षित अंतर ठेवून करावे. अपवादात्मक परिस्थितीत काही विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळाली नाहीत तर त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तातडीने अशा विद्यार्थ्यांना गत वर्षीची (२nd hand) पाठ्यपुस्तके संकलित करून देण्यात यावीत. तसेच नजीकच्या काळात या विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्यात यावा.

५. शिक्षकांनी स्वत:ची राहण्याची व्यवस्था ते ज्या गावात शाळेवर नियुक्त आहेत त्या गावातच करावी.

६. **डिजीटल शिक्षण :-** विद्यार्थ्यांच्या शारीरीक व मानसिक स्वास्थ्याचा विचार करता घरी राहून डिजीटल पद्धतीने अभ्यास पुढील वेळेच्या मर्यादेतच व्हावा.

(अ) पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी व इयत्ता १ ली व २ री च्या विदयार्थ्यासाठी ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा वापर करू नये. मात्र त्यांना टी.व्ही. व रेडिओवरील उपलब्ध शैक्षणिक कार्यक्रम दाखवावेत / ऐकवावेत.

(ब) इयत्ता तिसरी ते पाचवीसाठी कमाल १ तास प्रतिदिन

(क) इयत्ता सहावी ते आठवीसाठी कमाल २ तास प्रतिदिन

(ड) इयत्ता नववी ते बारावीसाठी कमाल ३ तास प्रतिदिन

डिजीटल अध्ययनामध्ये आवश्यकतेनुसार मोकळा वेळ (Break) देण्यात यावा. विद्यार्थ्यांचे सलग अध्ययन करुन घेण्यात येऊ नये.

## (ए) आरोग्य विभागाची जबाबदारी

१. आरोग्य विभागाने आवश्यकतेप्रमाणे शिक्षकांचे व मुलांचे थर्मल स्क्रिनिंग / वैद्यकीय तपासणी करुन घेण्यासाठीचे नियोजन करावे.
२. किमान ५ ते कमाल १० शाळांकरीता फिरते आरोग्य तपासणी केंद्र कार्यरत ठेवावे.

## (ऐ) जिल्हा प्रशासन/जिल्हा परिषद/ महानगरपालिका यांना सूचना.

१. शाळेचा परिसर स्वच्छ व निर्जंतुकीकरण करावा. सॅनिटायझर, मास्क व आवश्यक निर्जंतुकीकरण साहित्य जिल्हा प्रशासनाने उपलब्ध करून द्यावे. तसेच १५ वा वित्त आयोग व ग्राम पंचायत निधीचा आवश्यकतेप्रमाणे वापर करावा.
२. शालेय परिसरात व स्वच्छता गृहात पुरेशा प्रमाणात साबण व पाण्याची व्यवस्था करावी.
३. महानगरपालिकांनी शक्यतो शहरात मुलांच्या शैक्षणिक फायद्यासाठी विविध ठिकाणी मोफत Wi-Fi ची सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच शक्यतो स्थानिक केबल टिव्ही नेटवर्क/ व्हर्च्युअल शाळांच्या मदतीने मुलांना घरी अभ्यासक्रम पाठवावा.
४. आरोग्य विभागाच्या मदतीने कोरोना संसर्ग झालेल्या ठिकाणी सर्व मुलांची व शिक्षकांची वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी, विशेषत: मुख्यालयात न राहणारे व बाहेर गावातून येणाऱ्या शिक्षकांची वैद्यकीय तपासणी करावी.
५. महानगरपालिकांनी अभ्यासक्रम pre-load करुन Tab / SD cards विद्यार्थ्यांना पुरविण्याचा पथदर्शी प्रकल्प (Pilot project) राबवावा.
६. एखाद्या विद्यार्थी / शिक्षकास आजारपणाची लक्षणे आढळल्यास त्वरीत उपचार करण्याची व्यवस्था करावी.

**(ओ)** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे शैक्षणिक कॅलेंडर (दिनदर्शिका) व अभ्यासक्रम याचा आराखडा सर्व शाळांना उपलब्ध करून देण्यात यावा .

टाटा स्काय, जीओ यासारख्या खाजगी टी.व्ही.नेटवर्कच्या सहभागाने मुलांना शिक्षण देण्यासाठी पथदर्शी प्रकल्प (PILOT PROJECT) राबवावा.

**(औ) राज्यामध्ये पुढीलप्रमाणे टप्प्या-टप्प्याने प्रत्यक्ष शाळा सुरु करण्याविषयी स्थानिक पातळीवर प्रशासन, ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीने एकत्रित निर्णय घ्यावा.**

शाळा सुरु करण्यापूर्वी एक महिना गावामध्ये कोणताही कोविड १९ चा रुग्ण आढळला नाही याची खात्री करुन खालील वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष शाळा सुरु करण्यात याव्यात.

| अ.क्र. | इयत्ता | दिनांक |
|---|---|---|
| १ | नववी , दहावी व बारावी | जुलै, २०२० पासून |
| २. | सहावी ते आठवी | ऑगस्ट, २०२० पासून |
| ३. | तिसरी ते पाचवी | सप्टेंबर, २०२० पासून |
| ४ | पहिली व दुसरी | शाळा व्यवस्थापन समितीने निर्णय घ्यावा. टी.व्ही., रेडिओवर उपलब्ध होणारे शैक्षणिक कार्यक्रम त्यांना दाखविण्यासाठी / ऐकविण्यासाठी पालकांना प्रवृत्त करावे. |
| ५. | इयत्ता अकरावी | इयत्ता दहावीच्या निकालावर आधारीत अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर |

सदरचे वेळापत्रक हे संभाव्य स्वरूपाचे असून स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन त्याप्रमाणे शाळा सुरू करण्याचे नियोजन करण्यात यावे. तसेच आवश्यकतेनुसार नवीन प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने किंवा शाळेमध्ये गर्दी होणार नाही याची दक्षता घेऊन करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे संबंधित विभागांनी करावयाच्या कार्यवाहीचे योग्य नियोजन करून राज्यातील सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षण लवकरात लवकर कसे सुरु करता येईल याबाबतची पूर्वतयारी करून घ्यावी. तसेच परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक

२०२००६१२१२५०५७४४२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( राजेंद्र पवार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा.मंत्री,शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
६. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सर्व आयुक्त, महानगरपालीका (सर्व)
८. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
९. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
११. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे
१२. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे
१३. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र, पुणे
१४. संचालक, पाठ्यपुस्तक मंडळ (बालभारती), पुणे
१५. अध्यक्ष . महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
१६. सर्व विभागीय शिक्षण उप संचालक,
१७. सर्व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक),
१८. निवडनस्ती (एसडी-६)

***************

# परिशिष्ट

## शाळा पूर्वतयारी पंधरवडा

१) शाळा व्यवस्थापन समितीची सभा आयोजित करणे (प्रत्यक्ष /Online WhatsApp /VC)

२) स्थानिक पदधिकाऱ्यांशी समन्वय साधणे.

३) पाठ्यपुस्तक वितरण.

४) स्वच्छता, निर्जतुकीकरण्याचे प्रयत्न, स्वच्छतागृह पाण्याची व्यवस्था

५) गटागटाने पालक सभा घेऊन जनजागृती करणे, पालकांच्या मनातली भीती कमी करणे

६) बालरक्षक/शिक्षकांनी स्थलांतरित मजुरांची मुले, संभाव्य शाळाबाहय होण्याची शक्यता असणारे विदयार्थी यांच्या घरी भेटी देऊन शाळेत येण्याची मानसिकता तयार करणे

७) SARAL / U-DISE प्रणालीतील माहिती अद्ययावत करणे, विदयार्थ्यांचे आधार क्रमांक अद्ययावत करणे.

८) ग्रामपंचायतीच्या मदतीने टिव्ही/रेडीओ/कॉम्प्युटर यांची व्यवस्था करुन सोय नसलेल्या मुलांसाठी मदत करणे.

९) ग्रंथालयातील पुस्तकांचे अवांतर वाचन श्रमदान कवितालेखन.

१०) गुगल क्लासरुम, वेबिनार, डिजिटल पध्दतीने शिक्षणाचे शिक्षकांचे पालकांचे सक्षमीकरण.

११) दीक्षा App चा प्रसार आणि प्रसार.

१२) इ-कन्टेन्ट निर्मिती

१३) Google Form द्वारे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करणे.

१४) शाळेच्या स्पीकरवरुन विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शन

१५) प्रत्येक दिवशी दहा ते पंधरा पालकांना संपर्क करुन विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेणे, सायबर सुरक्षेविषयी शिक्षक, पालक, विद्यार्थी यांचे उद्बोधन.

राज्यातील शाळा सुरक्षितपणे सुरु करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४०/एसडी-६**
**मादम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : - १० नोव्हेंबर, २०२०**

वाचा :- १) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक १५ जुन, २०२०.
२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २४ जुन, २०२०.
३) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २२ जूलै, २०२०.
४) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक १७ ऑगस्ट, २०२०.
५) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एसडी-६; दिनांक २९ ऑक्टोबर, २०२०.
६) केंद्र शासनाच्या दि.०८.०९.२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचना.

पार्श्वभूमी :-

या विभागाच्या संदर्भ क्र. ०१ येथील शासन परिपत्रकानुसार राज्यात कोव्हीड- १९ च्या प्रादूर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत राज्यातील शाळा प्रत्यक्षात सुरु करणे शक्य नसल्याने दि.१५ जुन, २०२० पासून शैक्षणिक वर्ष सुरु करुन स्थानिक परिस्थितीनुसार प्रत्यक्ष शाळा टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त यांच्या सहाय्याने संबंधित शाळा व्यवस्थापन समिती यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्याचबरोबर शाळांमध्ये शिक्षकांच्या उपस्थितीबाबत दिनांक २४ जून, २०२० रोजीच्या परीपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये यासाठी वरील संदर्भ क्रमांक ०३ येथील परिपत्रकान्वये पूर्व प्राथमिक ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षणाचा कालावधी व शिक्षणाच्या स्वरूपाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

राज्यात Mission Begin Again अंतर्गत राज्यातील सर्व आस्थापना टप्प्या - टप्प्याने सुरु करण्यासाठी मार्गदर्शक सूचना (SOP) निर्गमित करण्यात येत आहेत. त्याच धर्तीवर शैक्षणिक वर्ष दि.१५ जून, २०२० पासून सुरू झाले असले तरी प्रत्यक्ष प्रथम: इयत्ता ९ वी ते इयत्ता १२ वी साठी शाळा सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>परिपत्रक:-</u>

१. राज्यातील इयत्ता ९ वी ते इयत्ता १२ वी चे वर्ग दिनांक २३ नोव्हेंबर, २०२० पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच इयत्ता ९ वी ते १२ वी चे वसतिगृह व आश्रमशाळा विशेषत: आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शाळा सुरु करण्यापूर्वी व शाळा सुरु झाल्यानंतर आरोग्य, स्वच्छत्ता व इतर सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबतच्या मार्गदर्शक सूचना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये देण्यात आल्या आहेत.

२. कोविड-१९ बाबत केंद्र व राज्य शासनाच्या सूचनांचे पालन करण्यात यावे. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत पालकांकडून आवश्यक ती लेखी संमती घेण्यात यावी.

३. या विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १५ जुन, २०२० व दिनांक २९ ऑक्टोबर,२०२० रोजीच्या परिपत्रकातील सुचनांचे पालन करण्यात यावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२०१११०१६४२४८३६२१ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(राजेंद्र पवार)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
४) मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
५) मा. सभापती व मा. उपसभापती, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
६) मा. मंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री, ( शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.
८) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

१०) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
११) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) प्रभारी संचालक, बालभारती,
१४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१६) शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक (सर्व)
१७) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व).
१८) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
१९) निवडनस्ती(कार्या.एसडी-६)

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४०/एसडी-६; दि. १० नोव्हेंबर, २०२० सोबतचे

## परिशिष्ट-अ

## शाळा सुरु करण्यापूर्वी आरोग्य, स्वच्छत्ता व इतर सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबतच्या मार्गदर्शक सूचना

**१) शाळेत स्वच्छता व निर्जंतुकीकरण विषयक सुविधा सुनिश्चित करणे:-**

- शाळेत हात धुण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे.
- Thermometer, Thermal Scanner/Gun, Pulse Oxymeter, जंतूनाशक, साबण, पाणी इत्यादी आवश्यक वस्तुंची उपलब्धता तसेच शाळेची स्वच्छता व निर्जंतुकीकरण स्थानिक प्रशासनाने (ग्रामीण व शहरी) सुनिश्चित करावी. वापरण्यात येणारे thermometer हे calibrated contactless infrared digital thermometer असावे.
- शाळा वाहतुक सुविधांचे निर्जंतुकीकरण सुनिश्चित करावे.
- एखाद्या शाळेत क्वारंटाईन सेंटर असल्यास स्थानिक प्रशासनाने ते इतर ठिकाणी स्थानापन्न करावे. स्थानिक प्रशासनाने अशा शाळेचे हस्तांतरण शाळा व्यवस्थापनाकडे करण्यापूर्वी त्याचे पूर्णत: निर्जंतुकीकरण करावे.
- क्वारंटाईन सेंटर इतर ठिकाणी नेणे शक्य नसल्यास शाळा खुल्या परिसरात किंवा इतर ठिकाणी भरवावी.

**२) शिक्षकांची कोविड-१९ बाबतची चाचणी:-**

- शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दि. १७ ते २२ नोव्हेंबर, २०२० या दरम्यान कोविड-१९ साठीची RTPCR चाचणी करणे बंधनकारक असेल.शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदर चाचणीचे प्रयोगशाळेने दिलेले प्रमाणपत्र शाळा व्यवस्थापनास सादर करावे. सदर प्रमाणपत्राची शाळा व्यवस्थापनाने पडताळणी करावी.
- ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे चाचणी अहवाल positive असतील त्यांनी डॉक्टरांनी प्रमाणित केल्यानंतरच शाळेत उपस्थित राहवे.
- ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे चाचणी अहवाल negative आहेत त्यांनी शाळेत उपस्थित राहताना कोविड-१९ संदर्भातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील. तसेच कोविड-१९ बाबतची लक्षणे आढळल्यास त्यांनी त्वरीत चाचणी करावी.

**३) कार्यगट गठीत करणे:-** सर्व भागधारकांचे त्यांच्या विशिष्ट जबाबदाऱ्यांसहित विविध कार्यगट गठित करावे जसे आपत्कालीन गट, स्वच्छता पर्यवेक्षण गट, इत्यादी. शिक्षक, विद्यार्थी व इतर भागधारक या गटांचे सभासद म्हणून सहकार्याने काम करतील.

**४) बैठक व्यवस्था :-**

- वर्गखोली तसेच स्टाफ रुम मधील बैठक व्यवस्था शारीरिक अंतर (Physical Distancing) च्या नियमांनुसार असावी.
- वर्गामध्ये एका बाकावर एक विद्यार्थी याप्रमाणे नावानिशी बैठक व्यवस्था असावी.

**५) शारीरिक अंतर (Physical distancing) च्या नियमांच्या अंमलबजावणीकरिता विविध चिन्हे व खुणा प्रदर्शित करणे :-**

- शाळेत दर्शनी भागावर Physical distancing, मास्कचा वापर इत्यादी संदर्भात मार्गदर्शक सूचना असणारे posters/stickers प्रदर्शित करावे.
- थूंकण्यावरील बंदीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
- शाळेच्या अंतर्गत व बाह्य परिसरामध्ये रांगेत उभे राहण्याकरिता किमान सहा फूट इतके शारीरिक अंतर (Physical distance) राखले जाईल याकरिता विशिष्ट चिन्हे जसे चौकोन, वर्तुळ इत्यादींचा वापर गर्दी होणारी ठिकाणे जसे पाणी पिण्याच्या सुविधा , हात धुण्याच्या सुविधा, स्वच्छतागृहे इत्यादी ठिकाणी करण्यात यावा.
- शारीरिक अंतर (Physical distance) राखण्यासाठी येण्या व जाण्याचे वेगवेगळे मार्ग निश्चित करणाऱ्या बाणांच्या खुणा दर्शविण्यात याव्यात.

**६) शाळेतील कार्यक्रम आयोजनावरील निर्बंध** :- परिपाठ, स्नेह संम्मेलन, क्रीडा व इतर तत्सम कार्यक्रम ज्यामुळे अधिक गर्दी होऊ शकते अशा कार्यक्रमांच्या आयोजनावर कडक निर्बंध असेल. शिक्षक- पालक बैठका ऑनलाईन घ्याव्यात.

**७) पालकांची संमती:-**

- विद्यार्थ्यांनी शाळेत उपस्थित राहण्यापूर्वी त्यांच्या पालकांची लेखी संमती आवश्यक असेल. शाळा व्यवस्थापन समितीने पालकांशी वरील विषयी चर्चा करावी.
- आजारी असलेल्या मुलांना पालकांनी शाळेत पाठवू नये.
- विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांच्या संमतीने घरी राहुन देखील अभ्यास करता येईल. अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीच्या मुल्यांकनाकरिता विशिष्ठ योजना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांनी तयार करण्यात यावी.

**८) विद्यार्थी, पालक, शिक्षक व समाजातील सदस्य यांना कोविड-१९ च्या संदर्भातील आव्हाने व त्याबाबतची त्यांची भूमिका याबाबत जागरुक करणे:-**

- शाळा सुरु करण्यापूर्वीच विद्यार्थी, पालक, शिक्षक व समाजातील सदस्य यांच्यात जागरुकता निर्माण करण्याकरिता शाळा व्यवस्थापन समितीने पत्रके, पत्रे व सार्वजनिक घोषणांच्या माध्यमांचा वापर करुन पुढील मुद्द्यांबाबत कार्यवाही करावी:-
  - i. वैयक्तिक स्वच्छता व नेहमी वापरण्यात येणारे पृष्ठभागांचे निर्जंतुकीकरण इत्यादीबाबत काय करावे किंवा काय करु नये याबाबतच्या सुचना.
  - ii. शारीरिक अंतर पालनाचे (Physical distancing) चे महत्व.
  - iii. कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी आवश्यक स्वच्छताविषयक सवयी.
  - iv. कोविड-१९ बाबतच्या गैरसमजुती.
  - v. कोविड-१९ ची लक्षणे आढळल्यास शाळेत जाणे टाळणे.
- केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या सुचनांनुसार, सर्वच कर्मचारी जे (कोविड-१९च्या अनुषंगाने) अधिक उच्च धोक्याच्या पातळीमध्ये आहेत, जसे वयोवृद्ध कर्मचारी, दिव्यांग कर्मचारी, गरोदर महिला कर्मचारी व जे कर्मचारी औषध-उपचार

घेत आहेत, त्यांनी अधिक काळजी घ्यावी. त्यांनी शक्यतो विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात येऊ नये.

**९) शाळेतील उपस्थिती व वैद्यकीय रजा याबाबतच्या धोरणांमध्ये सुधारणा करणे:-**

- विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती बंधनकारक नसून पूर्णत: पालकांच्या संमती वर अवलंबून असेल.
- पूर्ण उपस्थितीबाबतची पारितोषिके बंद करण्यात यावी.
- शाळेतील कर्मचाऱ्यांना त्यांना नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्त आणिबाणीच्या प्रसंगी इतर कर्मचाऱ्यांची कामे करण्यासाठी प्रशिक्षित करावे.

**१०) माहितीचे एकत्रिकरण :-**

- विद्यार्थी, पालक व शिक्षकांकडून पुढील माहिती स्वयंघोषित करुन घ्यावी:-
  त्यांची आरोग्याची स्थिती, आरोग्य सेतू ॲप वरील तपासणी अहवाल, तसेच अलीकडील आंतरराष्ट्रीय व आंतरराज्य प्रवासाची माहिती.
- स्थानिक प्रशासनाकडून राज्य व जिल्हा helpline तसेच जवळील कोविड सेंटर बद्दलची माहिती.

-------------------------XXXXXXXXXXXXXXXX-------------------------

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४०/एसडी-६; दि. १० नोव्हेंबर, २०२० सोबतचे

## परिशिष्ट-ब

## शाळा सुरू झाल्यानंतर आरोग्य, स्वच्छता व इतर सुरक्षाविषयक उपायोजनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना:-

**१) शाळेत व शाळेच्या परिसरात स्वच्छता व आरोग्यदायी परीस्थिती सतत राखणे:-**

- शाळेचा परीसर दररोज नियमितपणे स्वच्छ केला जावा.
- शाळेतील वर्गखोल्या व वर्गखोल्यांच्या बाहेरील नेहमी स्पर्श होणारा पृष्ठभाग जसे लॅचेस, अध्ययन-अध्यापन साहित्य, डेस्क, टॅबलेट्स, खुर्च्या इ.वारंवार स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- शाळेतील व शाळेच्या परीसरातील सर्व कचरा नियमितपणे विल्हेवाट लावण्यात यावी.
- हात धुण्याच्या सर्व ठिकाणी साबण, हॅन्डवॉश व स्वच्छ पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. शक्य झाल्यास अल्कोहोल मिश्रित हॅन्ड सॅनिटायझर सर्व महत्त्वाच्या ठिकाणी ठेवण्यात यावा.
- शाळेतील स्वच्छतागृहाचे वारंवार निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- सुरक्षित व स्वच्छ पिण्याचे पाणी विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात यावी. विद्यार्थ्यांनी सोबत वॉटर बॅाटल आणण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करावे.
- शाळा सुरू होण्यापूर्वी व शाळा सुटल्यानंतर शाळा व वर्ग खोल्यांचे नियमितपणे निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- **वरील सर्व स्वच्छतेमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊ नये.**

**२) शाळेत विद्यार्थ्यांना सुरक्षित ठेवणे :-**

- सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्ग यांनी शाळेत येताना व शाळेत असेपर्यंत तसेच, शाळेत कोणतीही कृती करताना मास्कचा वापर करावा. तसेच, विद्यार्थी मास्कची अदलाबदल करणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
- विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्गाची दररोज साधी आरोग्य चाचणी जसे Thermal Screening घेण्यात यावी.
- विद्यार्थी, शिक्षक व शाळेतील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तिला शाळेचा आवारात व शाळेच्या प्रवेशद्वारावर प्रवेश देऊ नये.
- काही विद्यार्थी सूचनांचे पालन करत नसल्यास ते त्यांच्या पालकांच्या निदर्शनांस आणावे.

**३) विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाची सोय करणे :-**

- कोविड-१९ संसर्ग टाळण्यासाठी पालकांनी शक्यतो विद्यार्थ्यांना स्वत: त्यांच्या वैयक्तिक वाहनाने शाळेत सोडावे.

- शाळा वाहतुकीच्या वाहनाचे दिवसातून किमान दोनवेळा ( विद्यार्थी वाहनात येतांना व वाहनातुन उतरल्यानंतर ) निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- वाहनचालक व वाहक यांनी स्वत: तसेच विद्यार्थी शारीरिक अंतराचे पालन करतील, याची दक्षता घ्यावी. किमान ६ फुट अंतर राखण्यात यावे.
- बस / कार यांच्या खिडक्यांना पडदे नसावेत. सामान्यत: खिडक्या उघडया ठेवण्यात याव्यात.
- वातानुकूलित बसेस मध्ये २४ ते ३० डिग्री सेल्सिअस तापमान राखावे.
- शक्य असल्यास वाहनात हॅन्ड सॅनिटायझर ठेवण्यात यावे.

**४) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचा सुरक्षित प्रवेश व गमन** (Entry and Exit) :-

- विद्यार्थ्यांनी शाळेने निश्चित केल्याप्रमाणे शाळेत उपस्थित रहावे. शाळेत वावरताना त्यांनी किमान ६ फुट अंतराचे पालन करावे.
- विद्यार्थी व कर्मचारी वर्गांचे आगमन व गमन (Entry and Exit) यांचे वेळापत्रक अशा प्रकारे निश्चित करावे, ज्यामुळे शाळेत होणारी गर्दी टाळली जाईल.
- विविध इयत्तांचे वर्ग सुरु होण्याच्या व संपण्याच्या वेळामध्ये किमान १० मिनिटांचे अंतर असावे.
- शाळेच्या परिसरात चार पेक्षा जास्त विद्यार्थी एकत्र जमणार नाहीत, ही मुख्यध्यापकांची जबाबदारी असेल.
- शाळेस एकापेक्षा अधिक प्रवेशद्वार असल्यास शाळेत येताना व जातांना सर्व प्रवेशद्वरांचा वापर करावा.
- शाळेच्या बाहेरील वाहनांची गर्दी टाळण्यासाठी वाहतुक पोलिस किंवा समाजातील स्वयंसेवकाची मदत घ्यावी.
- शाळेच्या प्रमुखांनी आजारी असल्याच्या कारणामुळे कर्मचाऱ्यास रजेवर राहण्याची परवानगी देण्यात यावी.
- कुटुंबातील एखादा सदस्य किंवा घराजवळील एखादी व्यक्ती ताप / खोकला यांनी आजारी असल्यास आपल्या मुलांना शाळेत न पाठविण्याबाबत पालकांना अवगत करावे.

**५) वर्गखोल्या व इतर ठिकाणी सुरक्षिततेच्या मानकांची खात्री करावी :-**

- शाळेत प्रात्यक्षिक कार्ये (Practicals) घेताना विद्यार्थ्यांचे लहान लहान गट करुन घेण्यात यावेत म्हणजे शारीरिक अंतराचे (Physical Distancing) पालन करणे सुलभ होईल.
- विद्यार्थ्यांनी कोणतेही साहित्य जसे पुस्तके, वही, पेन, पेन्सिल, वॉटर बॉटल, इत्यादींची अदलाबदल करू नये.
- ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय स्वीकारला असेल त्यांच्यासाठी ऑनलाईन गृहपाठाची व्यवस्था करावी.

- शक्य असल्यास वर्ग खुल्या परिसरात घ्यावेत. शक्य नसल्यास वर्गखोल्यांची दारे व खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात. कोणत्याही परिस्थितीत बंद खोल्यांमध्ये वर्ग भरवण्यात येऊ नये.
- उदवाहन (lift) व व्हरांड्यांतील उपस्थित व्यक्तीच्या संख्येवर निर्बध आणावेत.
- स्वच्छतागृहामध्ये अधिक गर्दी होऊ नये, याची दक्षता घ्यावी.
- विद्यार्थ्यांनी प्रत्येक कृती केल्यानंतर हात स्वच्छ धुवावेत.
- वातानुकुलित वर्ग खोल्यांचे तापमान २४ ते ३० डिग्री सेंटिग्रेड ठेवावे.

**६) अभ्यासवर्गांची व्यवस्था:-**

- शाळा व्यवस्थापन समितीने शाळेतील गर्दी टाळण्यासाठी एक दिवसआड विद्यार्थ्यांना शाळेत बोलवावे (५० टक्के विद्यार्थी एका दिवशी व उर्वरित ५० टक्के विद्यार्थी दुसऱ्या दिवशी). अशाप्रकारे एकाच दिवशी ५० टक्के विद्यार्थी ऑनलाईन वर्गात व उर्वरित ५० टक्के विद्यार्थी प्रत्यक्ष वर्गात उपस्थित राहून शिक्षण घेतील.
- इयत्ता निहाय ऑनलाईन व ऑफलाईन वर्गांचे वेळापत्रक, शिक्षकांची जबाबदारी निश्चिती याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची असेल. शक्यतो मुख्य विषय (Core Subjects) जसे गणित, विज्ञान व इंग्रजी शाळेत शिकवावेत व उर्वरित विषय शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने शिकवावेत.
- प्रत्यक्ष वर्गांचा कालावधी ३ ते ४ तासांपेक्षा अधिक असू नये. प्रत्यक्ष वर्गांकरिता जेवणाची सुट्टी नसेल.

**७) कोविड-१९ संशयित आढळल्यास करावयाची कार्यवाही :-**

- शिक्षक, कर्मचारी वर्ग किंवा विद्यार्थी संशयित आढळल्यास त्यास एका खोलीत इतरांपासून वेगळे ठेवावे.
- तात्काळ रुग्णालय किंवा जिल्हा व राज्य संपर्क क्रमांकास (Helpline) कळवावे. त्यानंतर सर्व परिसराचे व त्या जागेचे निर्जंतुकीकरण करावे. राज्य व जिल्हा helpline क्रमांक तसेच जवळील कोविड सेंटर बद्दलची माहिती मुख्याध्यापक व प्रत्येक शिक्षकांच्या मोबाईलमध्ये असावी.

**८) मानसिक व सामाजिक कल्याण :-**

- चिंता आणि निराशा यासारख्या मानसिक आरोग्याच्या समस्या नोंदविणाऱ्या किंवा सांगणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी नियमित समुपदेशन केले जाईल, याची सुनिश्चिती करावी.
- शिक्षकांनी, शालेय समुपदेशकांनी आणि शालेय आरोग्य कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे व आपले मानसिक स्थिरता निश्चित करण्यासाठी एकत्रितपणे कार्य करावे.

**उपरोक्त सूचनांव्यतिरिक्त स्थानिक परिस्थितीनुसार शाळांनी आवश्यक मार्गदर्शक सुचना निश्चित कराव्यात.**

-------------------------XXXXXXXXXXXXXXXX-------------------------

# INDIAN EDUCATION SOCIETY
## IES SECONDARY SCHOOL, CHARKOP
## (ENGLISH MEDIUM)
SECTOR 2, CHARKOP, KANDIVALI (W), MUMBAI-400 067.
E-mail : charkop.secondary.english@ies.edu


UDISE NO. : 27230700230

INDEX NO.32.06.032

Ref. No. SSC / 300 / 2020-21.

Date : 17.11.2020

Dear Parents/ Guardian,

Sub : 1. Re-opening of schooling physically and release of consent to send your child to physical school.
2. Government of Maharashtra Circular dated 15th June, 2020
3. Government of Maharashtra Circular dated 10th November, 2020

1. As you are aware, the Government of India and the Government of Maharashtra had directed schools to be closed during the lockdown period imposed due to the COVID-19 pandemic.

2. The two Governments have been lifting the lockdown in a phased manner and have permitted the re-opening of physical schooling, subject to certain terms and conditions. These terms and conditions ( Standard Operating Procedures – SOPs) have been set out by the Government of India ( Ministry of Education) and the Government of Maharashtra ( including School Education and Sports Department). These terms and conditions are available on the website of the respective ministries.

3. You are requested to read the SOPs of the respective Governments and take an informed decision and give informed consent or refusal as to whether you will be sending your child to the school physically.

4. In case any student is found not following the protocol, the School will not permit the student to attend school. Parents are expected to train their respective wards on all safety protocols such as wearing mask / social distancing / hand and other hygiene etc. while in School as well as while travelling to and from School.

5. Parents are also requested to confirm that in case their ward has come / comes in contact with COVID-19 patient, the parents will not send their ward to School, under intimation to the School. The parents will send their ward to School only after she / he is declared medically fit to attend after conducting necessary medical tests to confirm that their ward is COVID Negative

6. School reserves the right to not permit a student to attend School in case the School finds that the student is not following protocol / rules / discipline, and the decision of the School will be final and binding in this matter.

7. School / Management shall not be held responsible in case any illness is contracted by any student during this period of Schooling.

8. Parents / Guardians are requested not to visit the School during this period.

9. Parents / Guardians are requested to provide their ward with a spare mask / small hand sanitizer bottle as part of their daily routine. Parents are requested to train their wards not to share any item with fellow students during this period.

10. The format of consent is annexed hereto. Parents giving consent to send their ward to School may tick the "YES" box. Parents who do not wish to send their ward to School presently may tick the "No" box.

11. You are requested to fill in the same and return it to the school, at your earliest and, in any case, before 20.11.2020 to enable the school to take informed decisions for implementation of start of physical schooling.

M. M. Raje
17.11.2020
HM / ~~IN CHARGE~~

Head Mistress
I.E.S. Secondary School
Sector - 2, Charkop, Kandivali (W),
Mumbai - 400067.

# INDIAN EDUCATION SOCIETY
## IES SECONDARY SCHOOL, CHARKOP
## (MARATHI MEDIUM)
SECTOR 2, CHARKOP, KANDIVALI (W), MUMBAI-400 067.
E-mail : charkop.secondary.marathi@ies.edu


UDISE NO. : 27230700230 INDEX NO.32.06.032

Ref. No. SSC / 300 / 2020-21. Date : 17.11.2020

प्रिय पालक,

विषय - १. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीने शालेय शिक्षण पुन्हा सुरू करणे आणि आपल्या पाल्यास प्रत्यक्ष शाळेत पाठविण्यासाठी लेखी संमती कळविणे बाबत.
२. महाराष्ट्र शासन परिपत्रक दि. १५ जून, २०२०
३. महाराष्ट्र शासन परिपत्रक दि. १० नोव्हेंबर, २०२०

१. आपणास ठाऊकच आहे की भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने कोव्हीड -१९ या साथीच्या आजारामुळे लागू केलेल्या लॉकडाऊन कालावधीत शाळा बंद ठेवण्याचे निर्देश दिले होते.

२. दोन्ही सरकारे टप्प्याटप्प्याने लॉकडाउन शिथिल करीत आहेत आणि काही अटी व शर्तींच्या आधारे प्रत्यक्ष उपस्थितीने शिक्षण पुन्हा सुरू करण्याची परवानगी त्यांनी दिली आहे. या अटी व शर्ती (मानक कार्यप्रणाली - एसओपी) भारत सरकार (शिक्षण मंत्रालय) आणि महाराष्ट्र सरकार (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांनी तयार केल्या आहेत. या अटी व शर्ती संबंधित मंत्रालयांच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

३.आपणास संबंधित सरकारच्या एसओपी कार्यपद्धती वाचण्याची आणि निर्णयांची माहिती घेण्याची विनंती केली आहे आणि त्यानुसार आपण आपल्या पाल्यास प्रत्यक्ष शाळेत पाठविणार आहात की नाही याबद्दल संमतीपत्र देवून लेखी कळवावे.

४. विद्यार्थी प्रोटोकॉलचे/सूचनांचे पालन करीत नसल्याचे आढळल्यास, शाळा विद्यार्थ्याला शाळेत येण्याची परवानगी देणार नाही. पालकांनी त्यांच्या पाल्यांना शाळेत येता जाताना मास्क / सामाजिक अंतर / हाताची आणि इतर स्वच्छता इत्यादी सर्व सुरक्षा विषयक सूचनांचे प्रशिक्षण दयावे अशी अपेक्षा आहे.

५. पालकांनी त्यांचा पाल्य जर कॉव्हीड -१९ रूग्णाच्या संपर्कात आला असेल किंवा आजारी असेल तर पालकांनी आपल्या पाल्याला शाळेत पाठवू नये व तसे शाळेत कळवावे. पालकांनी आपला पाल्य शाळेत पाठविताना पाल्य कोव्हिड नकारात्मक आहे याची तपासणी करूनआवश्यक त्या वैद्यकीय चाचण्या घेतल्यानंतर वैद्यकीयदृष्ट्या उपस्थित राहण्यास वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त झाल्यानंतरच शाळेत पाठवावे.

६. विद्यार्थी जर शाळेत सूचना / नियम / शिस्त पाळत नसल्याचे आढळल्यास विद्यार्थ्याला शाळेत न घेण्याचा हक्क शाळेने राखून ठेवलेला आहे आणि या निर्णयाबद्दल शाळेचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

७. या शैक्षणिक वर्षात कोणताही विद्यार्थी आजारी झाल्यास शाळा / व्यवस्थापनास जबाबदार धरले जाणार नाही.

८. कृपया पालकांनी या कालावधीत शाळेत भेटण्यास येवू नये ही विनंती.

९. पालकांना विनंती आहे की त्यांच्या पाल्याला त्यांच्या दैनंदिन कामकाजाच्या साहित्यामध्ये अधिकचा मास्क, हातरुमाल, स्वच्छ पाण्याची बाटली विद्यार्थ्यांबरोबर द्यावी. या काळात सहकारी विद्यार्थ्यांकडून कोणतीही वस्तू सामायिकपणे न वापरण्याची पाल्याला प्रशिक्षित करण्याची विनंती पालकांना करण्यात येत आहे.

१०. संमती पत्राचा नमुना सोबत जोडला आहे. शाळेत आपला पाल्य पाठविण्यास संमतीपत्र देणारे पालक "होय" समोर बॉक्समध्ये टिक करु शकतात. ज्या पालकांना आपल्या पाल्यास प्रत्यक्ष सध्या शाळेत पाठवायचा नाही, ते "नाही" समोर बॉक्समध्ये टिक करु शकतात.

११. आपणास विनंती आहे की संमती पत्र लवकरात लवकर भरून दिनांक २०.११.२०२० पूर्वी कोणत्याही परिस्थितीत शाळेत जमा करावे म्हणजे प्रत्यक्ष उपस्थितीने शाळा सुरु करण्यासंबंधी निर्णय घेता येईल.

मुख्याध्यापिका / प्रभारी

M M Koje

17/11/2020

Head Mistress

I.E.S. Secondary School

Sector - 2, Charkop, Kandivali (W).

Mumbai - 400067.

REDMI NOTE 6 PRO

MI DUAL CAMERA